International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# महात्मा गांधी व पुणे करार

**अमित प्रकाश निकम[1], डॉ. रमेश धनराज जाधव[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
[2]संशोधन मार्गदर्शक व उप-प्राचार्य, आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर (धुळे)
**Corresponding Author – अमित प्रकाश निकम**
**DOI- 10.5281/zenodo.12739772**

**सारांश**

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली झालेली दांडी यात्रा व सविनय कायदेभंग चळवळीला मिळालेल्या जनतेच्या पाठींब्यामुळे भारतीयांना राजकिय सुधारणा देण्याच्या हेतूने इंग्लडमध्ये गोलमेज परिषदांचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत भातातील विविध धर्मियांचे, संस्थानिकांचे व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली, यावर चर्चा होऊन शेवटी इंग्लडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी आपला जातीय निवाडा जाहीर केला. यामध्ये अल्पसंख्यांकांना व दलितांना स्वतंत्र्य मतदार संघ देण्यात आले. यावेळी महात्मा गांधीनी येरवडा येथील तुरुंगात दलितांचे स्वतंत्र मतदार संघ रद्द करावेत यासाठी उपषोण सुरु केले. शेवटी एक तडजोड म्हणून डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात पुणे करार झाला, त्यानुसार स्वतंत्र्य मतदार संघ रद्द करुन त्या ऐवजी राखीव जागा देण्याचे मान्य करण्यात आले.

**प्रस्तावना:-**

हिंदू धर्मात वर्णव्यवस्थे अंतर्गत जातीसंस्था मोठ्या प्रमाण प्रचलित असल्यामुळे. तत्कालीन समाजात क्षुद्र वर्णातील जातीं मधील लोकांना फार मोठ्या प्रमाणात मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. त्यांचा उल्लेख दलित किंवा अस्पृश्य असाही केला जातो. या वर्गास शिक्षण घेण्याचा, सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी भरण्याचा, मंदिरात दर्शन घेण्याचा असे अनेक हक्क नाकारले. म्हणून डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी महाड येथे १९२७ मध्ये चवदार तळे आंदोलन केले. ज्या मनुस्मृतीच्या आधारावर दलितांना अधिकार नाकारले होते त्या मनुस्मृतीचे दहन करून मनुस्मृतीला नाकारले.

१९३१ च्या अखेरीस झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधित्वाचा विचार झाला. दलित हे हिंदूच असून देखील त्यांना अनेक अधिकार नाकारलेले असल्यामुळे, सवर्ण हिंदूकरवी अस्पृश्यांना योग्य प्रतिनिधित्व व रास्त राजकीय हक्क मिळणे अशक्य वाटल्यामुळे डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत अस्पृश्यांच्या राखीव जागांचा व विभक्त मतदारसंघाचा आग्रह धरला.

ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १७ ऑगस्ट १९३२ रोजी जातीय निवाडा जाहीर करून डॉ. आंबेडकरांची मागणी मान्य केली. त्यानुसार इंग्रज सरकारने दलितांना स्वतंत्र मतदार संघ घोषित केले. महात्मा गांधींची जातीय निवाड्या बद्दलची प्रतिक्रिया अत्यंत प्रखर होती. दलित जाती-जमातींना विभक्त मतदार संघ देऊन हिंदू समाजात फुट पाडण्याचा शासकांच्या ह्या कुटील डावामुळे ते विलक्षण अस्वस्थ झाले व २० सप्टेंबर १९३२ पासून प्राणांतिक उपोषण सुरु केले.अस्पृश्यता हा हिंदूंचा अंतर्गत, नैतिक व धार्मिक प्रश्न होता, राजकीय नव्हे, शिवाय अस्पृश्यांनाही त्यातून लाभ होणार नाही, अशी महात्मा गांधी यांची भूमिका होती. तर; डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राजकीय भवितव्य अधिक मोलाचे वाटत असल्यामुळे दोन्ही नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. हिंदू समाज एकसंघ राहावा यासाठी गांधीनी घेतलेली भूमिका व त्यामुळे निर्माण झालेला पेच सोडविण्यासाठी पुणे कराराच्या माध्यमातून महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात दलितांच्या राजकिय हक्कांबाबत तडजोड झाली असली तरी भविष्य काळात त्याचे फार मोठे परिणाम झालेले आढळतात.

**उद्दिष्ट्ये :-**

१. जातीय निवाडा व पुणे करार यांच्यातील दलितांना मिळालेला राजकिय तरतूदीचा अभ्यास करणे.
२. जातीय निवाडा विशेषतः स्वतंत्र मतदार संघाबाबत महात्मा गांधींची भूमिका.
३. स्वतंत्र मतदार संघ व राखीव जागा याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भुमिका यांचा अभ्यास करणे.

**गोलमेज परिषदा व जातीय निवाडा :-**

इंग्रज सरकारने भारतीयांसाठी दर दहा वर्षांनी नविन राजकिय तरतूदी देण्याची घोषणा केली असल्यामुळे १९१९ च्या मॉन्टेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणाकायद्यांनंतर भारतीयांनी राजकिय सुधारणा देण्याच्या उद्देशाने १९२८ मध्ये सायमन कमिशन भारतात आले होते. परंतु त्यात एकही भारतीय सदस्य नसल्याने त्यावर बहिष्कार टाकण्यात आला म्हणून इंग्रज सरकारने १९३० ते १९३२

या काळात तीन गोलमेज परिषदा इंग्लडमध्ये भरविल्या. त्यात अनेक मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

तीनही परिषदांचे अध्यक्ष इंग्लडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड होते. १९३० च्या पहिल्या गोलमेज परिषदेत भारतीय संघराज्य, संस्थाने व अल्पसंख्यांकांना स्वतंत्र मतदार संघ या बाबत विशेष चर्चा झाली. प्रामुख्याने मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, जमीनदार, कामगार यांच्या प्रतिनिधींन समवेत, दलितांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. काँग्रेस व महात्मा गांधी यांनी भारतात कायदेभंगाची चळवळ सुरु केली असल्यामुळे त्यांनी पहिल्या गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकला होता. तरीही सरकारने गोलमेज परिषदेत महत्वाची चर्चा घडवून आणली.

मुस्लिम, शिख, ख्रिश्चन इत्यादी आपसंख्यांकांच्या प्रतिनिधीनी स्वतंत्र्य मतदार संघाची मागणी केल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसाठी स्वतंत्र्य मतदार संघाची मागणी करुन आपल्या भाषणाद्वारे दलितांचे सामाजिक व राजकिय प्रश्न सरकारपुढे मांडले. महात्मा गांधी १९३१ मधील दुसऱ्या गोलमेज परिषदेस हजर राहिले व पुन्हा स्वतंत्र मतदार संघावर चर्चा सुरु झाली. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्यात या बावत वैचारीक संघर्ष निर्माण झाला, परंतु बाबासाहेबांनी आपली भूमिका गांधीना समजवून सांगण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीनी मी सर्व देशाचे नेतृत्व करीत आहे, त्यामुळे स्वातंत्र्याची मागणी महत्वाची आहे दलित हे हिंदूच असल्याने त्यांना वेगळा स्वतंत्र्य मतदार संघाची आवश्यकता नाही अशी भुमिका परिषदेत माडली.

**जातीय निवाडा व दलितांना स्वतंत्र मतदार संघ:**

गोलमेज परिषदेत एक मत होत नाही म्हणून इंग्लडचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यानी १६ ऑगस्ट १९३२ रोजी आपला 'जातीय निवाडा' जाहिर केला. त्यानुसार,

१. मुस्लिम, शिख, ख्रिश्चन, अॅग्लो इंडियन, युरोपियन, जमीनदार, कामगार इ यांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले.
२. मुस्लिमांना अल्पसंख्याक म्हणून त्यांचा लोकसंख्येपेक्षा अधिक प्रतिनीधित्व देण्यात आले.
३. वरील प्रमाणेच दलितांना राजकिय विकास व्हावा म्हणून प्रथमतः त्याना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले.

वरील जातीय निवाडा जाहीर झाल्यानंतर सर्व भारतभर खळबळ निर्माण झाली. या वेळी महात्मा गांधी पुणे येथील येरवडा तुरुंगात होते. या निवाड्याने सर्वांना न्याय दिला आहे असे, ब्रिटिश सरकारने आहीर केले. तर दलितांना प्रथमच स्वतंत्र मतदार संघ मिळाल्याने दलितांमध्ये आनंदोत्साह निर्माण झाला. नव्या संकल्पित कायदेमंडळात सर्व अल्पसख्यांकांना व दलितांना कसे प्रतिनिधत्व द्यायचे व भारतीय समाजात फुट पाडून कायदेमंडळात कोणत्याच एका गटाचे बहुमत राहणार नाही याची खबरदारी सरकारने घेतली होती.

**स्वतंत्र मतदार संघ व महात्मा गांधीची भूमीका**

महात्मा गांधीनी दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलितांच्या स्वतंत्र मतदार संघांस विरोध केला होता. तरीही सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मागणीनुसार दलितांना स्वतंत्र मतदार संघ जाहीर केले होते, या वेळी महात्मा गांधींनी तुरुंगातूनच ब्रिटीश प्रतंप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांना पत्र लिहून दलित हे हिंदूच असल्यामुळे त्याना स्वतंत्र मतदार संघ देणे म्हणजे हिंदू धर्मात फुट पाडणे होय. म्हणून असे मतदार संघ रद्द करावेत अन्यथा मी त्याविरोधत अमरण उपोषण करेल असे सांगितले. परंतू सरकारच्या मतानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे दलितांना त्यांचे प्रश्न कायदेमंडात मांडण्यासाठी स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले. महात्मा गांधीनी कोणतेच स्पष्टीकरण न ऐकता एरवडा तुरुंगातच २० सप्टेंबर १९३२ पासून अमरण उपोषणास सुरुवात केली. महात्मा गांधीच्या उपोषणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर वेगळया संकटात सापडले होते. सर्व भारत महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे मोठ्या आशेने बघत होते. स्वतंत्र मतदारसंघाबाबत तडजोड करावी म्हणून काँग्रेसचे अनेक नेते डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडीत मदन मोहन मालविय, सी. राजगोपालाचारी इ. प्रयत्नशील होते.

**स्वतंत्र मतदार संघ व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरकारशी मोठा संघर्ष करून दलितांना स्वतंत्र मतदार संघ व दुहेरी मतदार संघाचा अधिकार प्राप्त करून दिलेला होता. बाबासाहेबांच्या मतानुसार जरी दलित हे हिंदूच असले तरी त्यांना धर्माने बहिष्कृत केले असल्याने त्यांचा विकास होऊ शकला नाही. म्हणून कायदेमंडळात त्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व असणे आवश्यक आहे. महात्मा गांधींनी या विरोधात उपोषण करणे ही खेदाची गोष्ट आहे. त्यांनी उपोषण करुन दलितांवर संकट आणले आहे.

जातीय निवाडयाद्वारे मुस्लिम, ख्रिश्चन व शिख इ. अल्पसंख्यांकाना देखील मतदारसंघ देण्यात आले होते. परंतु फक्त दलितांचे मतदारसंघ रद्द होण्यासाठी महात्मा गांधीसारख्या राष्ट्रीय नेत्यायने उपोषण करुन नये असे बाबासाहेबांनी जाहीर केले. परंतु महात्मा गांधी उपोषण सोडण्यास तयार नव्हते. तर पर्यायी योजना असल्याशिवाय मी महात्मा गांधीची भेट घेणार नाही अशी बाबासाहेबांनी भूमिका घेतल्याने देशभरात काँग्रेस व दलित असे विरोधी वातावरण निर्माण झाले. शेवटी एक तडजोड म्हणून बाबासाहेबांनी महात्मा गांधींची येरवडा येथील तुरुंगात भेट घेतली व दोन्हीही नेत्यांमध्ये एक ऐतिहासिक करार झाला. त्यास 'पुणे करार' असे म्हणता.

**'पुणे करार'**

२४ सप्टेंबर १९३२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात पुणे करार झाला व महात्मा गांधींनी आपले उपोषण सोडले त्यानुसार..

१. दलितांना स्वतंत्र मतदार संघांएवजी राखीव आगा देण्याचे मान्य करण्यात आले.
२. प्रांतिय विधानसभेमध्ये १४८ आगा राखीव ठेवण्यात आल्या.
३. केंद्रीय कायदेमंडळात १८ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या
४. अस्पृशता पाळली जाऊ नये, पात्रता असलेल्या दलितांना नोकरी द्यावी.
५. सर्व प्रांतात दलितांचा शिक्षणासाठी वेगळे अनुदान राखून ठेवावे.

अशा प्रकारे पुणे करार होऊन स्वतंत्र मतदार संघाऐवजी राखीव जागा घेण्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यशस्वी झालेले आढळतात.

**निष्कर्ष :-**

हजारो वर्षापासून दलितांना सामाजिक, राजकिय, आर्थिक अधिकार हिंदू धर्माने नाकारले होते. त्यांना पाण्यासाठी या देशात संघर्ष करावा लागत होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचा विकास व्हावा या हेतूने दलितांच्या व्यथा गोलमेज परिषदेत मांडून त्यांना स्वतंत्र मतदारसंघ बहाल केले होते. ह्या मतदारसंघात फक्त दलितच प्रतिनिधी निवडणूकीस उभे राहाणार होते. मतदानही फक्त दलितच करणार होते. त्यामुळे इतरांना मतदान करण्याचा अधिकार नव्हता व शिवाय त्याच मतदार संघामध्ये जनरल मतदार देखील होते.अशा वेळी दलितांना इतर प्रतिनिधीस मतदान करण्याचा म्हणजे स्वतंत्र संघामुळे दुहेरी मतदानाचा अधिकार रद्द झाल्याने सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पक्षास मोठी हानी झाली. त्यांच्या 'शेड्युल कास्ट फेडरेशन' या राजकिय पक्षाचे सर्व जागा जिंकल्या असल्या तरी, पुणे करारामुळे दलितांना राखीव जागा दिल्याने ज्या भागात दलित मोठ्या संख्येने होते, असे मतदार संघ हे आजच्या काळासारखा राखीव ठेवण्यात आला असल्याने, काँग्रेसने बाबासाहेबांच्या विरोधी भूमिका असलेल्या इतर दलितांना काँग्रेसची तिकीटे देऊन बाबासाहेबांच्या पक्षाचा पराभव केल्याचे आढळते. म्हणजे पुणे कराराने दलितांचे मोठे नुकसान झाले. असे बहुजन पार्टीचे माजी अध्यक्ष मा. काशीराम म्हणतात.

महात्मा गांधींनी हिंदू धर्मात फुट नको म्हणून उपोषण केले परंतु काँग्रेस व महात्मा गांधी यांनी दलितांसाठी कोणत्याच उपाययोजना केलेल्या नव्हत्या. पुणे करारानंतर महात्मा गांधींनी अस्पृशांना 'हरिजन' म्हणजे देवांची लेकरे असे नाव देऊन जातीयता नाहीशी व्हावी म्हणून 'हरिजन' सेवक संघाची स्थापना केली. काही काळ महात्मा गांधींनी जातीयता नष्ट व्हावी याकडे लक्ष केंद्रित केल्याचे आढळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी हे दलितच असल्याचे त्यांना अनेक संकटांना तोड द्यावे लागले होते. दलितांचा विकास हा राजकिय सत्तेत सहभागी झाल्यास झपाटयाने होईल असे बाबासाहेबांचे मत होते. म्हणून त्यांनी दलितांमध्ये राजकिय जागृती घडवून आनण्यासाठी स्वतंत्र मजुर पक्ष व 'शेड्युल कास्ट फेडरेशन' या दोन राजकिय पक्षांची स्थापना केली. भविष्यात आर.पी.आय. या पक्षाची घोषणा केली.

एकंदरीत पुणे कराराने स्वतंत्र मतदार संघ जरी रद्द झाले असले तरी राखीव जागा दलितांना देऊन त्यांचा राजकिय विकास होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे.

**समारोप :-**

डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी महात्मा गांधीच्या उपोषणामुळे जरी स्वतंत्र मतदारसंघ रद्द केले असले तरी दलितांसाठी राखीव जागा घेण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यशस्वी झालेले आढळतात. भविष्यकाळात भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी अत्यंत यशस्वीपणे दलितांचा विकास करण्यासाठी राजकरण, नोकरी व शिक्षण या तीन क्षेत्रात आरक्षण लागू केले.

महात्मा गांधीचा दृष्टीकोन हा हिंदू एकात्मतेचा होता, तर बाबासाहेबांचा दृष्टीकोन हा दलितांचा विकास करण्याचा होता. शेवटी महात्मा गांधींच्या मदतीने डॉ. बाबासाहेबांचा आंबेडकरांनी राज्यघटनेत दलितांसाठी आरक्षण ठेवून त्यांना त्यांचा विकास करण्याची संधी देण्यात आली आहे.

**संदर्भ :-**


१. प्रा. डॉ. तांबोळी एन. एस., आधुनिक भारत, निराली प्रकाशन, पुणे
२. डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. फडके य. दि., डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह
४. जोंधळे व्ही.बी., आपले बाबासाहेब, साकेत प्रकाशन, छत्रपती संभाजीनगर
५. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे
६. कुबेर वा. ना. डॉ. आंबेडकर विचारमंथन, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई